क्रमांक : ९२५३ / क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.
दिनांक : १६ ऑगस्ट, २०२४.

**:: परिपत्रक ::**

या सचिवालयातील विविध कक्षांमध्ये कामकाजाशी निगडित माहिती, नस्त्या व कागदपत्रे अशा सर्व साहित्यांचे डिजिटलायजेशन प्रकल्पामध्ये समावेश करण्यात आला आहे. जेणेकरून प्रत्येक कक्षाला त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती डिजिटल स्वरूपात जतन करता येईल व आवश्यकतेनुसार कार्यालयीन कामकाज व संदर्भासाठी त्या माहितीचा उपयोग करता येईल.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या डिजिटलायजेशन प्रकल्पासाठी नेमण्यात आलेल्या निविदाव्दारे नियुक्त करण्यात आलेल्या M/s TCIL व त्यांच्या Consortium कंपन्यांचे तीन-चार प्रतिनिधी व ग्रंथालयातील एक प्रतिनिधी, हे प्रत्येक कक्षाला स्कॅनिंगच्या कामाच्या प्राथमिक पाहणीसाठी भेट देतील. या भेटी दरम्यान ते कक्षातील अधिकारी व कर्मचारी यांच्याशी संवाद साधून कक्षात उपलब्ध असलेल्या सर्व प्रकारच्या साहित्याची पाहणी करतील व कुठल्या प्रकारे त्या साहित्याचे व्यवस्थित स्कॅनिंग करता येईल याची माहिती घेतील. प्रत्येक कक्षाकडून त्यांची आवश्यकता, प्राधान्यक्रम व नियोजनानुसार कक्षाने दिलेले साहित्य स्कॅनिंगसाठी घेतले जाणार आहे. या भेटीसाठी संबंधित कक्षाच्या अधिकाऱ्यांशी बोलून त्यांच्या सोयीच्या वेळेनुसार कक्षाला भेट देतील. डिजिटलायजेशन प्रकल्पांतर्गत या सचिवालयातील ग्रंथालय कक्ष वगळून इतर कक्षांमधील स्कॅनिंगच्या कामाची पूर्वतयारी करण्याच्या दृष्टीने सर्व कक्षांना डिजिटलायजेशनं प्रकल्पामध्ये समावेश करावयाच्या त्यांच्या कक्षात असणारी माहिती, महत्त्वाच्या नस्त्या व संदर्भासाठी आवश्यक असणाऱ्या साहित्याची माहिती तसेच डिजिटलायजेशन माध्यमातून प्रत्येक कक्षाची संबंधित माहिती कशाप्रकारे व कोणत्या स्वरूपात अपेक्षित आहे याबाबतची सविस्तर माहिती विधानमंडळाच्या डिजिटलायजेशन प्रकल्पासाठी नेमण्यात आलेल्या Telecommunications Consultants Ltd. (TCIL) कंपनीच्या संल्लागारांना ते कक्षास भेट देतील त्यावेळेस उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करावी.

**(सुभाष नलावडे)**
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

..२/-

\\mls-dataserver\C Branch\१४०१\C-१०१\Local Disk (d)\E Drive\२०२४\liabrary (PIC)\Circular.doc

**प्रति,**

या सचिवालयातील सर्व कक्ष.

**प्रतिलिपी :-**

१) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव.

२) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

३) मा.विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानपरिषद/विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

४) सचिव-१ (कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.

५) सचिव-२ (कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.

६) समितीतील संबंधित अधिकारी/कर्मचारी.

७) 'ज' (ग्रंथालय) कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

८) निवडनस्ती.